6 AUG 2018
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलविज्ञानात संशोधकांना भरपूर संधी

## अमेरिका येथील पर्ड्यू विद्यापीठातील प्रा. व्यंकटेश मेरवाडे यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जलविज्ञानाचे शास्त्र उन्नत करण्यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी याकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. आपत्ती टाळण्यासाठी पूरग्रस्त भागाचे नकाशे अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार करणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन अमेरिकेच्या पर्ड्यू विद्यापीठातील प्रा. व्यंकटेश मेरवाडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त भौगोलिक माहिती प्रणालीच्या सहाय्याने आपत्ती व्यवस्थापन" या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी डेहराडून येथील इस्रोचे शास्त्रज्ञ भास्कर निकम, तमिळनाडूच्या चेन्नई विद्यापीठातील डॉ. सुलोचना शेखर यांची प्रमुख उपस्थिती होती.




कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. व्यंकटेश मेरवाडे. सोबत डॉ. विद्या चौगुले, डॉ. पन्हाळकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. टी. पाटील.

प्रा. मेरवाडे म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन जागतिक समस्येचे निराकरण करण्यासाठी सरकारी संस्था आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे अमेरिकेला प्रतिवर्षी सहा अब्ज रूपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे भारतातही मोठ्या प्रमाणात हानी होते. हे नुकसान टाळण्यासाठी नवतंत्रज्ञानाचा अभ्यासपूर्ण उपयोग करणे आवश्यक आहे. पुराचे अचूक पूर्वानुमान लावण्यासाठी यंत्रणा सक्षम करणे गरजेचे आहे. अमेरिकेत फेडरल इमर्जन्सी या संस्थेकडून पुराबाबत माहिती घेतली जाते. भारतात येणाऱ्या पुरांचे अथवा पावसाचे योग्य अंदाज बांधून येथील गटारींचे, नाल्यांचे व्यवस्थापन मजबूत करणे आवश्यक आहे. सर्वसामान्य नागरिकांनीही आपल्याकडे पडणाऱ्या पावसाच्या नोंदी संबंधित संस्थेस कळविल्यास, भविष्यामधील हानी टाळणे शक्य आहे.

सुरवातीला कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते अधिविभागातील विद्यार्थ्यांना संशोधनामध्ये कौशल्य प्राप्त होण्यासाठी तीस टॅबचे वितरण करण्यात आले. भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी.टी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एम.बी. पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विद्या चौगुले यांनी आभार मानले. यावेळी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, डॉ. सी.टी. पवार, डॉ. एस. बी. देशमुख, डॉ.रमोत्रा, डॉ. पी.के. दत्ता यांच्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा येथून आलेले तज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

## रघुनाथ पाटील : शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय कार्यशाळा; शेतीच्या बळावर देशाला कार्बन क्रेडिट शक्य

# पर्यावरणीय मूल्य मिळणे शेतकऱ्यांच्या हिताचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शेतकऱ्यांनी लावलेल्या कोट्यवधी झाडांचे पर्यावरणीय मूल्य मिळणार असेल, तर शेतकरी आत्महत्या थांबण्यास ते उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि शेतकरी संघटनेतर्फे आयोजित 'कार्बन क्रेडिट्स आणि जल व्यवस्थापन' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. भाषाभवन सभागृहामधील कार्यक्रमास कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय कार्यशाळेत शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून पी. डी. राऊत, बालेखान मुजावर, डी. आर. मोरे, देवानंद शिंदे उपस्थित होते.**

शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पाटील म्हणाले, शेतकरी हा खरा संशोधक आहे. शेतीच्या माध्यमातून अन्नधान्यांच्या विविध वाणांचा प्रयोगांती शोध लावून पिकविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असतो. शेतकरी पिकांच्या माध्यमातून शेतीला पाणी देतो, म्हणजेच तो पृथ्वीचे तापमान कमी करण्यास सहकार्य करीत असतो. देशातील विविध भागांमध्ये उपलब्ध परिस्थितीत शेतीच्या माध्यमातून देश जगविण्याचे महत्त्वाचे कार्य तो करतो. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, विविध उद्योगधंदे व इतर माध्यमांतून कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण अधिक झाल्याने ते साठवणूक करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. जास्तीत जास्त पद्धतीने शेतीमध्ये हे करता येणे शक्य आहे. यामुळे वातावरणातील कार्बनचा भार कमी होणार आहे. शेतकरी कशाप्रकारे कार्बन साठवणूक करतो, त्याचे मूल्यमापन कसे करणार, यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे. शेतीच्या बळावर देशाला मोठ्या प्रमाणावर कार्बन क्रेडिट्स् मिळविणे शक्य आहे. या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, बालेखान मुजावर, गिरीश राऊत, प्रणाली राऊत, ए. डी. जाधव यांच्यासह सोलापूर, पंढरपूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, नाशिक, बीड, आदी विविध भागांतील शेतकरी उपस्थित होते. पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### संस्कारांचा वारसा

पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळणे ही एक सामाजिक जबाबदारी आहे. जनजागृतीतून शेतीच्या पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन करणे, ही आता गरज बनली आहे. त्याचप्रमाणे शेतकरी आणि ग्रामीण भाग हे संस्कारांचा वारसा जपणारे मोठे केंद्र आहे; त्यामुळे शेतकऱ्यांचे आई-वडील वृद्धाश्रमात दिसत नाहीत, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# पुराच्या पूर्वानुमानासाठी सक्षम यंत्रणेची गरज

## प्रा. व्यंकटेश मेरवाडे यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'जलविज्ञानाचे शास्त्र उन्नत करण्यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी याकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. आपत्ती टाळण्यासाठी पूरग्रस्त भागाचे नकाशे अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार करणे अत्यंत निकडीचे आहे', असे प्रतिपादन अमेरिकेच्या पर्ड्यू विद्यापीठातील प्रा.व्यंकटेश मेरवाडे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त 'भौगोलिक माहिती प्रणालीच्या सहाय्याने आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रा.मेरवाडे बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू



डॉ.डी.टी.शिर्के अध्यक्षस्थानी होते. यावेळी डेहराडून येथील इस्रोचे शास्त्रज्ञ भास्कर निकम, तमिळनाडूच्या चेन्नई विद्यापीठातील डॉ.सुलोचना शेखर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, 'नैसर्गिक आपत्ती टाळण्यासाठी पुढच्या अनेक वर्षांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक आहे. जिओइन्फर्मेटीक्स तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पूरजन्य परिस्थिती योग्य नियोजनाने हाताळणे शक्य आहे. शिक्षणाच्या पारंपरिक पद्धतीच्या पलीकडे जाऊन वेगवेगळ्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून संशोधनात्मक शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारी पाळणे आवश्यक आहे.'

प्रारंभी कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते अधिविभागातील विद्यार्थ्यांना संशोधनामध्ये कौशल्य प्राप्त होण्यासाठी तीस टॅबचे वितरण करण्यात आले. भूगोल अधिविभागप्रमुख डॉ.सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी.टी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा.विद्या चौगुले यांनी आभार मानले, तर डॉ. एम.बी. पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी श्री. मुस्तफा, डॉ. सी.टी. पवार, डॉ. एस.बी. देशमुख, डॉ.रमोत्रा, उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, डॉ. पी.के. दत्ता यांच्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा येथून आलेले तज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतीतून कार्बन क्रेडिट्स शक्य

## कार्बन क्रेडिट आणि जलव्यवस्थापन कार्यशाळेत कुलगुरू डॉ. शिंदे यांचे मत

▶▶ कोल्हापूर टाइम्स टीम

भारत हा शेतीप्रधान देश असून शेतीच्या बळावर देशाला मोठ्या प्रमाणावर कार्बन क्रेडिट्स मिळविणे शक्य आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कार्बन क्रेडिट्स आणि जल व्यवस्थापन' या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहामध्ये आयोजित कार्यशाळेस शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील, विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर (डावीकडून) डॉ. पी.डी. राऊत, डॉ. गिरीश राऊत, डॉ. डी.आर. मोरे, रघुनाथ पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी.एस. पाटील, डॉ. प्रणाली राऊत.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'औद्योगिकीकरणाला सुरुवात केल्यापासून निसर्गाच्या साधनसंपत्तीच्या रक्षणाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण जास्त झाले आहे. विविध उद्योगधंदे व इतर माध्यमांतून कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण अधिक झाल्याने ते साठवणूक करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. वातावरणातील कार्बनचा भार कमी होणार आहे. शेतकरी कशाप्रकारे कार्बन साठवणूक करतो, त्याचे मूल्यमापन कसे करणार, यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे.'



कुलगुरू पुढे म्हणाले, 'जनजागृतीतून शेतीच्या पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन करणे ही आता गरज बनली आहे. त्याचप्रमाणे शेतकरी आणि ग्रामीण भाग हे संस्कारांचा वारसा जपणारे मोठे केंद्र आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आई-वडील वृद्धाश्रमात दिसत नाहीत,' असे मतही त्यांनी व्यक्त केले.

यावेळी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील म्हणाले, 'शेतकरी हा खरा संशोधक आहे. शेतीच्या माध्यमातून अन्नधान्यांच्या विविध वाणांचा प्रयोगांती शोध लावून पिकविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असतो. शेतकऱ्यांनी लावलेल्या कोट्यवधी झाडांचे पर्यावरणीय मूल्य मिळणार असेल तर शेतकरी आत्महत्या थांबण्यास ते उपयुक्तच ठरेल. पिकांच्या माध्यमातून शेतकरी शेतीला पाणी देतो, म्हणजेच तो पृथ्वीचे तापमान कमी करण्यास बहुमोल सहकार्य करीत असतो. देशातील विविध भागांमध्ये उपलब्ध परिस्थितीत शेतीच्या माध्यमातून देश जगविण्याचे महत्त्वाचे कार्य तो करतो.'

यावेळी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख तथा अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. बालेखान मुजावर, डॉ. गिरीष राऊत, डॉ. प्रणाली राऊत, डॉ. ए. डी. जाधव यांच्यासह सोलापूर, पंढरपूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, नाशिक, बीड आदी राज्याच्या विविध भागांतून आलेले शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सकाळ

# पूरग्रस्त भागाचे नकाशे अद्ययावत हवेत

## प्रा. मेरवाडे; शिवाजी विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापनावर कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : 'आपत्ती टाळण्यासाठी पूरग्रस्त भागाचे नकाशे अद्यावत तंत्रज्ञानाच्या साह्याने तयार करणे निकडीचे आहे, असे प्रतिपादन अमेरिकच्या पर्ड्यू विद्यापीठातील प्रा. व्यंकटेश मेरवाडे यांनी आज येथे केले.


प्रा. व्यंकटेश मेरवाडे

शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवीवर्षानिमित्त' भौगोलिक माहिती प्रणालीच्या साह्याने आपत्ती व्यवस्थापन' विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. यावेळी डेहराडून येथील इस्रोचे शास्त्रज्ञ भास्कर निकम, तमिळनाडूच्या चेन्नई विद्यापीठातील डॉ. सुलोचना शेखर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. मेरवाडे म्हणाले, ''आपत्ती व्यवस्थापन या जागतिक समस्येचे निराकरण करण्यासाठी सरकारी संस्था तसेच विशेष तज्ज्ञांची मदत घेतली पाहिजे. नैसर्गिक आपत्तींमुळे अमेरिकला प्रतिवरषी सहा अब्ज रूपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे भारतातही मोठ्या प्रमाणात हानी होते. हे टाळणयासाठी नवतंत्रज्ञानाचा अभ्यासपूर्ण उपयोग करणे आवश्यक आहे. पुराचे अचूक पूर्वानुमान लावण्यासाठी यंत्रणा सक्षम करणे गरजेचे आहे.'' प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''नैसर्गिक आपत्ती टाळण्यासाठी पुढच्या अनेक वर्षांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक आहे. जिओइन्फर्मेटीक्स तंत्रज्ञानाच्या साह्याने पूरजन्य परिस्थिती योग्य नियोजनाने हाताळणे शक्य आहे. शिक्षणाच्या पारंपरिक पद्धतीच्या पलीकडे जाऊन वेगवेगळ्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून संशोधनात्मक शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारी पाळणे आवश्यक आहे.'' यावेळी श्री.मुस्तफा, डॉ. सी. टी. पवार, डॉ. एस. बी. देशमुख, डॉ. रमोत्रा, उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, डॉ. पी. के. दत्ता उपस्थित होते. भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एम. बी. पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. टी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. विद्या चौगुले यांनी आभार मानले.